**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक १५ ऑगस्ट २०२५**

**ठळक बातम्या**

1. **देशातील युवकांसाठी आजपासून एक लाख कोटी रुपयांची "पंतप्रधान विकसित भारत रोजगार योजना" सुरु करत असल्याची, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची, लाल किल्ल्यावरून घोषणा.**
2. **देशासह राज्यात स्वातंत्र्य दिनाचा उत्साह, उत्तम शिक्षण आणि मनुष्यबळ विकासाच्या जोरावर महाराष्ट्र देशाच्या विकासाचे नेतृत्व करेल असा, मुख्यमंत्र्यांना विश्वास.**
3. **नागपूरसह विदर्भात स्वातंत्र्य दिनाचे बहुविध कार्यक्रम, नागपुरात पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपूरला विकासात अग्रेसर ठेवण्याचा व्यक्त केला निर्धार.**
4. **जम्मू-काश्मीरच्या किश्तवाड जिल्ह्यात ढगफुटीच्या बळींची संख्या ४५.**

**स्वातंत्र्यदिन-पंतप्रधान नरेंद्र मोदी**

स्वातंत्र्य दिनानिमित्त आज नवी दिल्लीत, लाल किल्ल्याच्या तटबंदीवर, पंतप्रधानांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. त्यानंतर त्यांनी देशवासियांना संबोधित केलं. आजच्या दिनाचं औचित्य साधून, देशातील युवकांसाठी आजपासून, एक लाख कोटी रुपयांची, पंतप्रधान, विकसित भारत रोजगार योजना सुरु करत असल्याची घोषणा, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी केली. पहिली नोकरी करणाऱ्या तरुण-तरुणींना, पंधरा हजार रुपये मिळतील तर रोजगार देणाऱ्या कंपन्यांनाही, प्रोत्साहनपर लाभ दिला जाईल असं, त्यांनी सांगितलं. या योजनेचा देशातील, साडेतीन कोटी तरुणांना फायदा होणार असल्याचंही ते म्हणाले.

***प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजना आज ही 15 अगस्त को लागू हो रही है। इस योजना के तहत निजी क्षेत्र में पहली नौकरी पाने वाले नौजवानों को पंधरा हजार रुपये सरकार की तरफ से दिए जाएंगे। कंपनियों को भी नए रोजगार देने के अवसर जो भी ज्यादा जुटाएगा, उनको भी प्रोत्साहन राशि दी जाएगी। करीब करीब साढेतीन करोड नौजवानों को रोजगार के नए अवसर बनाए।***

आगामी दिवाळीत, जी.एस.टी. अर्थात वस्तू आणि सेवा कर प्रणालीमध्ये सुधारणा केल्या जातील, यामुळे करांचा बोजा कमी होईल असं त्यांनी, यावेळी सांगितलं.

***पिछले 8 साल से हमने जीएसटी का बहुत बड़ा रिफॉर्म किया। पूरे देश में टैक्स के बढ़न को कम किया। समय की मांग है कि हम एक बार उसको रिव्यु करें। हमने एक हाई पावर कमेटी को बिठाकर के रिव्यु शुरू किया, राज्यों से भी विचार विमर्श किया। हम नेक्स्ट जनरेशन जीएसटी रिफॉर्म्स ले करके आ रहे हैं। ये दिवाली के अंदर आपके लिए तोहफा बन जाएंगे। सामान्य मानवी की जरूरतों के टैक्स भारी मात्रा में कम कर दिए जाएंगे।***

शेतकरी, मच्छीमार आणि पशुपालक यांना, प्राधान्य असून त्यांच्या हिताशी, कोणतीही तडजोड स्वीकारणार नाही, असं पंतप्रधान म्हणाले. तत्पूर्वी ७९व्या स्वातंत्र्य दिनी, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी, आज राष्ट्रीय, समर स्मारक इथं शहिदांना श्रद्धांजली वाहिली.

**स्वातंत्र्यदिन-मुख्यमंत्री**

देशाच्या ७९व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त, राज्यात मंत्रालय इथं, मुख्य शासकीय सोहळा झाला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, ध्वजारोहण झालं. यावेळी मुख्यमंत्र्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान दिलेल्या सर्व स्वातंत्र्य सैनिकांना तसंच शहीद जवानांनाही, आदरांजली वाहिली. जगातली सर्वोत्तम उत्पादनं भारतात तयार करण्यासाठी, प्रयत्न करणं गरजेचं असल्याचं ते, उपस्थितांना संबोधित करताना म्हणाले. स्वदेशी उत्पादनांचा वापर करून, आत्मनिर्भर भारताला बळकटी दिली जात आहे. देशात येत असलेल्या परदेशी गुंतवणुकीपैकी, ४० टक्के गुंतवणूक, महाराष्ट्रात येत असून, वस्तू निर्मिती, निर्यात आणि स्टार्ट-अप्समध्ये, महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर असल्याचं त्यांनी सांगितलं.

***आज भारताच्या या संपूर्ण विकास व्यवस्थेमध्ये अतिशय वेगानं पुढे जाणाऱ्या एक राज्य म्हणजे आपलं महाराष्ट्र राज्य आहे. महाराष्ट्राने विकसित भारताच्या स्वप्नामध्ये विकसित महाराष्ट्राची भर टाकण्याकरता आपलं कार्य सुरू केला आहे. मला सांगताना आनंद वाटतो की आज भारतामध्ये जी काही थेट परदेशी गुंतवणूक येते त्यापैकी 40 टक्के गुंतवणूक हि एकट्या महाराष्ट्रामध्ये आपण आलेली बघितली आणि मोठ्या प्रमाणात या गुंतवणुकीतून रोजगाराची निर्मिती आज महाराष्ट्रामध्ये होते आहे.***

उत्तम शिक्षण आणि मनुष्यबळ विकासाच्या जोरावर, महाराष्ट्र देशाच्या विकासाचे नेतृत्व करेल, असा विश्वास, त्यांनी व्यक्त केला. आपल्या भाषणातून त्यांनी प्रत्येक समाज घटकाचा, तसंच पायाभूत सुविधांच्या विकासासाठी, केल्या जात असलेल्या कामांविषयी सांगितलं. छत्रपती शिवाजी महाराज आणि संतांनी दाखवलेल्या वाटेवर, महाराष्ट्र चालत राहील असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते वर्षा या त्यांच्या निवास स्थानीही ध्वजारोहण झालं. पुण्यात राजभवन इथंही ध्वजारोहणाचा कार्यक्रम झाला. यावेळी राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी, राष्ट्रध्वज फडकावून, तिरंग्याला मानवंदना दिली.

**स्वातंत्र्यदिन -बावनकुळे**

नागपुरचा मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ, महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते विभागीय आयुक्त कार्यालयाच्या प्रांगणात संपन्न झाला. नागपूर शहर अधिक सुरक्षित व्हावे यासाठी, शहरात सी.सी.टीव्हीचे जाळे मजबूत करणार असल्याचं पालकमंत्री यावेळी म्हणाले. सायबर सुरक्षा अधिक बळकट करण्यात येत असल्याचं त्यांनी सांगितलं. याशिवाय नागपुरात, मेट्रो टप्पा तीनबाबत, सादरीकरण करण्यात आलं असून, त्या माध्यमातून नागपूरचे ग्रोथ पॉईंट, जोडले जातील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

***मिहान प्रकल्पामध्ये आता आपण उंची घेतो आहे. सार्वजनिक वाहतूक मेट्रोमध्ये आपण पुढे जातो आहे. मेट्रोमध्ये तर आपण त्या ठिकाणी तिसरा टप्प्याकडे आपण चाललो आहे. हर्डीकरजी यांनी परवा जो प्लान दाखवला. तो प्लान जर आपण इम्प्लिमेंट केला तर या नागपूर जिल्ह्याचे संपूर्ण ग्रोथ सेंटर नागपुरला जोडले जातील अशी एक चांगली योजना माननीय हर्डीकरजी यांनी मान्यनीय मुख्यमंत्री, मला नितीनजी गडकरी साहेबांना दाखवली शेवटी तुम्ही आम्ही सर्व मिळून मुख्यमंत्री आणि मान्यनीय नितीन गडकरींजीना एवढी ताकद देऊ तेवढी त्या पद्धतीने विकासाची योजना पुढे जाणार आहे.***

यावेळी नागपूर जिल्हयाला सर्वच क्षेत्रात, साजेसा ठेवण्याचा निर्धार, व्यक्त करून यात शासकीय अधिकारी, जनसामान्य आणि सर्वांच्या सहभागाची अपेक्षा व्यक्त केली.

**स्वातंत्र्य दिन-विदर्भ**

विदर्भातील सर्व जिल्हयात आज, ७९वा भारतीय स्वातंत्र्य दिन सोहळा, अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वत्र, 'हर घर तिरंगा' अभियानाचा उत्साह, सरकारी आणि विविध खासगी संस्था संघटना, शाळा महाविद्यालय यांनी आयोजित केलेले, सांस्कृतिक आणि देशभक्तीपर कार्यक्रम, बाईक रॅली, प्रभात फेऱ्या यांनी, स्वातंत्र्य दिनाचा उत्साह द्विगुणित झाला. विदर्भातील अन्य जिल्हयांमध्ये देखील, स्वातंत्र्य दिनाचा उत्साह बघायला मिळला. गार निर्माण करणारा आणि सर्वदृष्टीनं परिपूर्ण **गडचिरोली** निर्माण करण्याचा संकल्प, राज्याचे वित्त आणि नियोजन, कृषी, मदत आणि पुनर्वसन, विधी आणि न्याय, कामगार राज्यमंत्री तथा जिल्हयाचे सह-पालकमंत्री ॲड.आशिष जयस्वाल यांनी आज व्यक्त केला. ते ध्वजारोहण केल्यानंतर उपस्थितांना संबोधित करत होते. राज्याचे कामगार मंत्री तथा अकोला जिल्हा पालकमंत्री, ॲड.आकाश फुंडकर यांच्या हस्ते, **अकोला** जिल्हाधिकारी कार्यालय इथं ध्वजारोहण करण्यात आलं. **भंडाऱ्यातील** पोलीस कवायत मैदानात, राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री आणि भंडाऱ्याचे पालकमंत्री, संजय सावकारे यांच्या हस्ते, ध्वजारोहण सोहळा, उत्साहात पार पडला. **वाशीम** जिल्हाधिकारी कार्यालयात, जिल्हयाचे पालकमंत्री तथा कृषीमंत्री, दत्तात्रेय भरणे यांच्या हस्ते, ध्वजारोहणाचा सोहळा पार पडला. **बुलढाणा** इथं जिल्हाधिकारी कार्यालयात बुलढाणा जिल्हयाचे पालकमंत्री मकरंद जाधव-पाटील यांच्या हस्ते, शासकीय ध्वजारोहण करण्यात आलं. **गोंदिया** पोलिस मुख्यालयातील कवायत मैदानावर, राज्याचे कौशल्य विकास, रोजगार उद्योजकता आणि नाविन्यता विभागाचे मंत्री, मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते, शासकीय ध्वजारोहण सोहळा पार पडला. **यवतमाळ** इथल्या जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्री, संजय राठोड यांच्या हस्ते, मोठ्या उत्साहात, संपन्न झाले. डॉ.अशोक उईके यांनी चंद्रपूर इथं ध्वजारोहण केलं. **वर्धा** जिल्हयात शासकीय ध्वजारोहण, राज्यमंत्री तथा जिल्हयाचे पालकमंत्री, डॉ.पंकज भोयर यांच्या हस्ते, झालं. लोकाभिमूख योजनांच्या माध्यमातून, शेवटच्या घटकापर्यंत लाभ पोहोचविण्यात येत असून, सर्वंकष प्रयत्नांनी, प्रत्येक क्षेत्रात प्रगती होत आहे. समाजातील वंचित घटक, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक, महिला आदी सोबतच, शेती आणि शेतकरी केंद्रबिंदू मानून, सर्वसमावेशक विकास करून, राज्य प्रगतीकडे वाटचाल करीत आहे, असं प्रतिपादन, शालेय शिक्षण मंत्री, दादाजी भुसे यांनी केलं. **अमरावती,** विभागीय आयुक्त कार्यालयाच्या प्रांगणात, भारतीय स्वातंत्र्याचा 78व्या वर्धापन दिनानिमित्त मुख्य ध्वजारोहण सोहळा पार पडला.

**ढगफुटी**

जम्मू-काश्मीरच्या किश्तवाड जिल्ह्यात काल झालेल्या ढगफुटीमुळे किमान ४५ जणांचा मृत्यू झाला असून यात C.I.S.F.चे दोन कर्मचारी आणि मछैल माता यात्रेसाठी आलेल्या अनेकांचा समावेश आहे. आत्तापर्यंत वाचवण्यात आलेल्या शंभरपेक्षा जास्त जणांपैकी ३८ जणांची प्रकृती गंभीर असून, असंख्य नागरिक अद्याप बेपत्ता आहे. मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती आहे. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, राज्य आपत्ती प्रतिसाद दल, पोलीस, लष्कर आणि स्थानिकांच्या मदतीनं मदत आणि बचाव कार्य सुरू आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदीनी आज जम्मू काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा आणि मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्याशी संवाद साधला आणि परिस्थितीची माहिती घेतली.

**हवामान**

विदर्भातील वर्धा, अकोला, गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, अमरावती, बुलडाणा, वाशीम, यवतमाळ आणि नागपूर या जिल्ह्यांमध्ये, काही ठिकाणी विजांच्या कडकडाट, वादळी वाऱ्यासह, पाऊस पडण्याची शक्यता आहे. नागपूर, अकोला, अमरावती, वाशीम, यवतमाळ, वर्धा इथं तुरळक ठिकाणी, मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली असून खबरदारीचं इशारा घेण्यास सांगितलं आहे.

*****